## वार्ता टिपण दि.२८/०४/२०१७

### (एकुण २ गावठी पिस्तोल व २ काडतुसासह गुन्हेगार प्रॉपर्टी सेल कडून जेरबंद )

दि.२८/०४/२०१५ रोजी,प्रॉपर्टी सेल गुन्हे शाखा पुणे शहर विभागाचे पोलीस निरीक्षक श्री.एस व्हि शिंदे हे त्यांचे स्टाफसह कार्यालयात हजर असताना पो हवा तुपे यांना त्यांचे बामीदारामार्फत बातमी मिळाली की,आझाद चौक निगडी पुणे येथे राहणारा विशाल दोरवे याचे कडे पिस्टल असुन तो पिस्टल घेऊन शक्ती भक्ती गार्डन निगडी येथे दुपारी ३.०० वाजता येणार आहे. विशाल दोरवे हा रंगाने गोरा अंगाने मजबूत अंगात राखाडी रंगाचा हाफ टी शर्ट व काळी पॅंट तो डावे बाजूस भांग पाडतो.अशी बातमी मिळाल्याने ते,स्वतःतसेच पो हवा ३५०८ जगताप,पो हवा ४७९२ कुंभार पो हवा ३०९७ कोळी पो ना ५८८५ भुजबळ असे प्रॉपर्टी सेल कार्यालयात हजर असताना १३.३० वा सदर बाबत कार्यालयात हजर असलेले पो नि श्री सतीश शिंदे प्रापर्टी सेल गुन्हे शाखा यांना कळविली असता त्यांनी लागलीच वरील सर्व स्टाफला त्यांचे समक्ष बोलावून घेऊन मिळाले बातमी प्रमाणे खात्री करुन कारवाई करा असा आदेश दिला.

सदर ठिकाणी वर नमूद पथकातील अधिकारी व कर्मचारी यांनी सापळा लावुन इसम नामे आरोपी नामे विशाल राजू दोरवे वय २५ रा. आझाद चौक जिवलग हौसिग सोसा बि नं ७ प्लॅट नं ३१५ निगडी पुणे यास पकडुन त्याचेकडुन दोन गावठी पिस्तोल व दोन जिवंत काडतुसे असा कि.रु. ७०,५००/- चा मुददेमाल जप्त करण्यात आला आहे. त्याचे विरूध्द निगडी पोलीस ठाणे पुणे शहर येथे गु.र.नं.233/२०१७ आर्म ॲक्ट क.३ सह २५ व मुंबई पोलीस कायदा क.३७(१)(३) सह १३५ प्रमाणे गुन्हा दाखल केला असून,त्यामध्ये त्यास दि.२८/०४/१७ रोजी अटक केली आहे.

सदरची कामगिरी ही गुन्हे शाखेचे अपर पोलीस आयुक्त मा.श्री.दिपक साकोरे (अति कार्य.) सो.पोलीस उपायुक्त मा.श्री.पी.आर.पाटील सो.सहा.पोलीस आयुक्त मा.श्रीसुरेश भोसले सो. यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेचे प्रापर्टी सेल पोनिरी. एस व्हि शिंदे पोलीस कर्मचारी पो हवा जितेद्र तुपे पो हवा जगताप पोहवा कुंभार पो हवा कोळू पो ना भुजबळ चालक स पो फौ ढोले यांनी केली आहे.